# मराठी, इंग्रजी आणि विज्ञान www.mngogate.com मधील लेख M10 -- म. ना. गोगटे

लेखकसंपर्क वेबसाईट इंडेक्सपानावर

विज्ञानामुळे मानवी जीवनात प्रचंड क्रांती व सुधारणा झाली हे सर्वजण जाणतात. विज्ञानाची शक्य तितकी माहिति प्रत्येकाने समजून घेतली, तर त्या व्यक्तीचा व समाजाचाही फायदा होईल हे उघड आहे. मातृभाषेतून विचारांचे आदानप्रदान करणे सोपे असते, हेही सर्वमान्य आहे. विज्ञानाची माहिती काही प्रमाणात मराठीमध्ये विविध प्रसारमाध्यमातून दिली जाते, ही एक चांगलीच गोष्ट आहे. शालेय पातळीवर विज्ञानशिक्षणासाठी मराठी भाषा गेली कित्येक वर्षे वापरली जात आहे. त्यासाठी अध्यापक आहेत, पुस्तके आहेत, परिभाषा उपलब्ध आहे. खरा प्रश्न आहे तो उच्च पातळीवर विज्ञान शिक्षणाचा, व त्यावर आधारित उच्च व्यवसाय, उद्योग, संशोधनसंस्था यांचा. तेथे इंग्रजीचाच मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असतो, याबद्दल कित्येकजण खेद व कडक टीका व्यक्त करतात. कित्येक विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा नीट येत नसल्यामुळे विज्ञानविषय समजत नाहीत. त्यांच्या बाबतीत शिक्षण ही एक पोपटपंची ठरते, असेही म्हटले जाते. या बाबतीत काही विचार येथे मांडले आहेत.

कोणत्याही सामाजिक प्रश्नावर उपाय शोधताना स्थलकाल व परिस्थिती ध्यानात घेतली पाहिजे. अमेरिकेत केवळ लाखो इंग्रजीभाषिक पोचले नाहीत. तेथे लाखो अन्यभाषिक लोकही गेले. समर्थ राष्ट्र निर्माण करणे हे एक मोठे आव्हान त्यांच्यापुढे होते. तेथे मातृभाषेतून शिक्षण देण्याचे आंदोलन झाल्याचे ऐकीवात नाही. घरात किंवा खासगी क्लबमध्ये कोणतीही भाषा वापरता येते. पण रस्त्यावर, प्रशासनात, उद्योगव्यवसायात, शिक्षणात इंग्रजीच वापरली पाहिजे हा तेथे दंडक आहे.

इंग्रजीवाचून जपान हा देश बलाढ्य झालाच ना ? असा प्रश्न काहीजण विचारतात. त्यावर उत्तर हे की जपान हा एकभाषी देश आहे, व कित्येक शतके स्वतंत्र आहे. एकोणीसाव्या शतकात एका अमेरिकन युद्धनौकेने जपानचा पराभव केल्यावर जपान खडबडून जागा झाला. अंतर्मुख होऊन त्याने आधुनिक विज्ञानाचा अवलंब केला. आपल्याकडे काय परिस्थिती आहे ? दीर्घकालीन पारतंत्र्य, प्रचंड लोकसंख्या व त्यामुळे होणारे तुटवडे, कित्येक भाषा, प्रचंड भ्रष्टाचार, विविध जमातींमधील दुजाभाव, अंधश्रद्धा, लोकशाहीचे धिंडवडे ! आपण प्रखर राष्ट्रवाद निर्माण केला नाही. समान नागरी कायदा दूरच राहिला, पण हिंदीलाही नीट राष्ट्रभाषा केली नाही. या परिस्थितीत सर्व जीवनकलह तीव्र होणार आहेत. प्रत्येकाने स्वगुण वाढवण्यासाठी इंग्रजी भाषा नीट, निदान कामचलाऊ शिकावी.

मेरी झांशी नही दूंगी, ही 1857 मधील घोषणा देशभक्तीची होती. पण तशी घोषणा 1947 मध्ये देशद्रोहाची ठरली असती. इतिहासाचे संदर्भ असे बदलतात. एकेकाळचे हाडवैरी जर्मनी व फ्रान्स हे देश आता मित्र झाले आहेत. साम्राज्यभाषा हा इंग्रजीचा अवतार संपून ती आता जागतिक संपर्काची, विज्ञानाची, व्यापाराची भाषा आहे, हे वास्तव मान्य करणे हिताचे आहे.

विज्ञानाचे शेकडो प्रयोग केल्यावर एखादे तंत्रज्ञान साकार होते. ते यशस्वी होण्यासाठी योग्य कायदे, योग्य वित्तपुरवठा, योग्य दळणवळण अशा कित्येक घटकांची गरज असते. या सर्वांसाठीही समर्थ भाषा लागते. कोणत्याही प्रकल्पास नकाशे व तंत्रज्ञ लागतात, भांडवल लागते, भागधारकांना अहवाल व लाभांश द्यायचा असतो, उत्पादित वस्तुंवर लेबले लावावी लागतात, वस्तु वापरण्याची माहितीपुस्तके तयार करावी लागतात, ठिकठिकाणी खटले चालू असतात, पेटंट मिळवायचे असते. अशा नानाविध कारवायांसाठी बहुभाषी, बहुलिपी भारतात इंग्रजी सोयीची ठरली आहे. प्रत्येक ग्राहकाच्या व कामगाराच्या मातृभाषेत व्यवहार करणे उद्योगांना सोयीचे नसते. काही भाषिक सक्ती केल्यास उद्योगधंदे अन्य राज्यात निघून जाण्याची शक्यता असते. प्रशासनासाठी स्थानिक भाषा आवश्यक आहेत, त्यांची जरूर प्रगती व्हावी. तरीपण सर्वत्र टेलिफोनबुके व वाहनांच्या नंबरप्लेटी इंग्रजीत असणे सोयीचे आहे. विज्ञान व तंत्रज्ञान यातला नवीन पदवीधर लागलीच तज्ञ होत नाही. काही अनुभव आणि इंग्रजीतली गहन माहितीची चर्चासत्रे व नियतकालिके यांद्वारा तो तज्ञ बनतो.

पोपटपंची केवळ इंग्रजीमुळे होते असे नाही. विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढेल अशा रीतीने मराठीतूनही सप्रयोग शिक्षण कित्येकांना मिळत नाही. बर्फ पाण्यात का तरंगतो, याची वैज्ञानिक माहिती दिली जाते, पण केरोसीनचाही बर्फ होतो काय, व तो तरंगतो काय, अशा प्रकारची जिज्ञासा विद्यार्थीमनात फुलवली जात नाही. थोडीशी माहिती एखाद्या भाषेतून फेकणे हे पुरेसे शिक्षण नव्हे.

आपल्याला दुसऱ्याचे दोष दिसतात, स्वताचे दिसत नाहीत. मुंबई, पुणे यांसाठी बॉम्बे, पूना हे शब्द इंग्रजीत वापरले जात असत, म्हणून टीका झाली. आम्ही मात्र इंग्लिश, वडोदरा यांसाठी इंग्रजी, बडोदे असेच उल्लेख मराठीमध्ये करणार ! मालवणी, अहिराणी बोलींचा विकास मराठी इतका होणार नाहीत हे आम्हांस दिसते. इंग्रजी, हिंदी यांच्याइतकी मराठीची प्रगती होणार नाही, हे मात्र आम्हास पटत नाही ! बहुभाषी भारताची संसद, लष्कर, राजदूत कार्यालये, मोठे उद्योग व संशोधनसंस्था यांमध्ये इंग्रजी व हिंदी यांनाच स्थान आहे. इंग्रजीची स्पेलिंगे विक्षिप्त आहेतच, पण मराठीतली नामांची लिंगे विक्षिप्त आहेत हे आपण विसरतो ! मराठीतले तो बर्फ, ते पाणी, ती वाफ हे शब्द एकाच पदार्थाची तीन लिंगे दाखवतात. स्पेलिंगे समजली की इंग्रजी शिकायला फारशी अवघड नाही. ऑक्सिजन, स्लॅब असे शेकडो पारिभाषिक तांत्रिक इंग्रजी शब्द मराठीत घेऊन त्यांना सोयीचे नामलिंग द्यावे. बाष्पीभवन या मराठी शब्दास इंग्रजीत इव्हॅपरेशन म्हणतात, असेही शिकवावे.

लाखो लोकांना इंग्रजी नीट येत नाही म्हणून मराठीत शक्य तितके विज्ञान हवेच आहे. पण इंग्रजी शिकून तिच्यात उत्तम लेखन व संवाद करण्यावर आपण भर दिला पाहिजे. इंग्रजीमुळे चांगले व्यवसाय व रोजगार मिळतात. इंग्रजीतले तंत्रज्ञान वापरून उद्योगधंद्यानी आर्टपेपर, कॅमेरे, रेडिओ, संगणक वगैरे समाजास दिले. त्यांचा लाभ मराठी साहित्य व कला यांनाही मिळाला !

*प्रसिद्धी सकाळ 5 डिसेंबर 2003 (वगैरे) (समाजास) दरम्यान (शब्द) ही संपादकांची भर येथे काढली*